**प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक <u>सूचना निर्गमित करण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : प्रगायो-२०१९/प्र.क्र.१०३/अजाक**
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २६ ऑगस्ट, २०१९

**प्रस्तावना :**

सन २०११ च्या राष्ट्रीय जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येच्या १६.६% लोकसंख्या अनुसूचित जाती या प्रवर्गाची आहे. भारताच्या राज्यघटनेतील प्रस्ताविकेत देशातील सर्व नागरीकांना सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय देण्याचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे. राज्यघटनेतील भाग ४ मध्ये मार्गदर्शक तत्वे या मथळ्याखाली कलम ४६ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि इतर दुर्बल घटक यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंर्वधन करण्याची जबाबदारी राज्यावर सोपविलेली आहे. त्यानुषंगाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कल्याणाच्या विविध योजना राज्य शासनामार्फत राबविण्यात येतात.

राज्यातील अनुसूचित जातीच्या व्यक्तिंना राज्यातील इतर प्रगत समाजाच्या बरोबरीत आणण्यासाठी शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये शैक्षणिक विकास, आर्थिक विकास व सामाजिक अभिसरणाच्या योजनांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागात ज्या ठिकाणी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्या आहेत, अशा वस्त्यांमध्ये पाणी पुरवठा, रस्ते, विज पुरवठा, मल:निस्सारण, गटारे, समाज मंदिरे इत्यादी मुलभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी सन १९७४ पासून 'अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे' ही योजना राबविण्यात येते.

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाने सन २००९-१० या वर्षापासून प्रायोगिक तत्वावर प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजना लागू केलेली आहे. सदर योजनेंतर्गत **<u>अनुसूचित जातीची ५०% पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यात</u>** व अशा राज्यातील ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांत पाणी पुरवठा, रस्ते इत्यादी मुलभूत सोयीसुविधांची कामे व इतर उपक्रम राज्य शासनाच्या इतर योजनांशी मेळ घालून (Convergence of the Schemes) मंजूर केली जातात. या योजनेसोबतच राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची सदर गावांमध्ये अंमलबजावणी करून सदर गावांचा सर्वांगीण विकास करणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. सदर योजनेंतर्गत संबंधित गावात मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व गावातील सर्व नागरीकांचे जीवनमान उंचावणे हा प्रमुख हेतू आहे. सदर योजनेंतर्गत मंजूर निधी खर्च करतांना केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या इतर योजनांतून प्राप्त झालेला निधी व प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजनेंतर्गत मिळणारा निधी यांचा मेळ घालून (Convergence ) योजना/कार्यक्रम राबविणे अपेक्षित आहे.

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाने सन २०१८-१९ या वर्षात सदर योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्र राज्यातील १४५ गावांची निवड करून त्यासाठी रूपये १५०७.६० लक्ष इतका निधी मंजूर केलेला आहे. तसेच सदर योजनेच्या अमंलबजावणीसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

उपरोक्त वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमिवर सदर योजना महाराष्ट्र राज्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी विविध पातळीवरील समित्यांचे गठन करणे व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned with CamScanner

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाने योजनेच्या तिसऱ्या टप्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील २५ जिल्हयातील एकूण १४५ गावांची निवड केलेली आहे. सदर गावांमध्ये योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित यंत्रणांनी गावाच्या सर्वागीण विकासासाठी खालील बाबींवर/ घटकांवर काम करणे अपेक्षित आहे:

१. पिण्याच्या पाण्याची सुविधा व मल:निस्सारण
२. शिक्षण
३. आरोग्य व पोषक आहार सुविधा
४. सामाजिक संरक्षण
५. ग्रामीण रस्ते व गृहनिर्माण
६. विज पुरवठा व गॅस जोडणी
७. कृषीविषयक उपाययोजना
८. वित्तीय पुरवठयाच्या सोयीसुविधा
९. संगणकीकरण सुविधा (डिजिटायजेशन)
१०. रोजगार निर्मिती व कौशल्य विकास

सदर १० बाबींच्या अनुषंगाने केंद्र शासनाने एकूण १०० गुणांचा गुणांकन तक्ता तयार केलेला असून तो या सोबतच्या 'परिशिष्टामध्ये' दर्शविलेला आहे.

सदर योजनेंतर्गत सर्वसाधारणपणे खालील २ मुद्दयांबाबत उपाययोजना करावयाच्या आहेत:

**१. योजनांचे एकत्रिकरण (Convergence of Schemes) :**

गांवाच्या सर्वांगिण विकासासाठी (शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक अभिसरण) राज्य शासन व केंद्र शासनामार्फत ज्या विविध योजना कार्यान्वीत आहेत, त्या योजनांसाठी प्राप्त निधी व प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजनेंतर्गत प्राप्त निधी याचा एकत्रितपणे विचार करुन (Convergence of Schemes) योजना राबविणे अपेक्षित आहे. या योजनांमध्ये केंद्र शासन व राज्य शासनाच्या खालील योजनांचा समावेश आहे:

**अ) सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाद्वारा राबविण्यात येणाऱ्या योजना :**

**१. शैक्षणिक विकासाच्या योजना :**

- ✓ अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती
- ✓ इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती
- ✓ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती
- ✓ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना टॉप क्लास एज्युकेशन स्कॉलरशिप
- ✓ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेश शिष्यवृत्ती
- ✓ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना नॅशनल फेलोशिप
- ✓ अनुसूचित जाती व इतर मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांना मोफत शिकवणी वर्ग (कोचिंग क्लासेस)
- ✓ बाबू जगजीवनराम छात्रावास योजना



Scanned with CamScanner

२. आर्थिक विकासाच्या योजना :

- ✓ Allocation of funds for Welfare of SCs (AWSC)
- ✓ Special Central Assistance to Scheduled Caste Sub Plan (SCA to SCSP)
- ✓ Self-Employment Schemes for Rehabilitation of Manual Scavengers (SRMS)
- ✓ Schemes run by National Scheduled Caste Finance and Development Corporation (NSFDC)
- ✓ Schemes run by National Safai Karmcharis Finance and Development Corporation (NSKFDC)
- ✓ Schemes run by Dr. Ambedkar Foundation
- ✓ Schemes run by State Scheduled Castes Development Corporations (SCDCS)
- ✓ Credit Enhancement Guarantee Scheme for SCs
- ✓ Venture Capital Fund for SCs

३. **Schemes for Social Empowerment :**

- ✓ Scheme for implementation of PCR Act, 1955 & SC & ST (POA) Act, 1989
- ✓ Assistance to Voluntary Organizations Working for the Welfare of SCs

ब. केंद्र शासनाच्या विविध विभागांद्वारे राबविण्यात येणाऱ्या महत्वाच्या योजना खालीलप्रमाणे आहेत:

| Sr. | Concerned Ministry / Department | Name of the Programme |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | Ministry of Drinking Water & Sanitation | National, Rural Drinking Water Programme<br>Swachh Bharat Mission (SBM) |
| 2 | Ministry of Human Resource Development | Samagra Shiksha & Mid-day-Meal (MDM)<br>National Literacy Mission (NLM) |
| 3 | Ministry of Health & Family Welfare | National Rural Health Mission<br>Mission Indradhanush<br>Ayushman Bharat Scheme (Pradhan Mantri Jan Aarogya Yojana) (PMJAY)<br>Janani Suraksha Yojana |
| 4 | Department of Rural Development, M/o RD | National Social Assistance Programme (NSAP)<br>Pradhan Mantri Gram Sadak Yojana (PMGSY)<br>Deen Dayal Upadhyay Antyodaya Yojana – National Livelihoods Mission (NRLM) (DAY-NRLM) |
| 5 | Ministry of Power | Deen Dayal Upadhyaya Gram Jyoti Yojana (DDUGJY)<br>Pradhan Mantri Sahaj Bijli Har Ghar Yojana (Saubhagya)<br>Unnat Jeevan by Affordable LEDs and Appliances for All (UJALA) |
| 6 | Ministry of Petroleum and Natural Gas | Pradhan Mantri UJJAWALA Yojana |
| 7 | Ministry of Finance | Pradhan Mantri Suraksha Bima Yojana(PMSBY)<br>Pradhan Mantri Jeevan Jyoti Bima Yojana(PMJJBY)<br>Pradhan Mantri Jan Dhan Yojana (PMJDY) |
| 8 | Ministry of Skill Development and Entrepreneurship | Pradhan Mantri Kaushal Vikas Yojana(PMKVY) |



Scanned with CamScanner

| Sr. | Concerned Ministry / Department | Name of the Programme |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 9 | Ministry of Agriculture and Farmers Welfare | Soil Health Card Scheme Rashtriya Krishi Vikas Yojana. National Horticulture Mission Technology Mission for Integrated Development of Horticulture in N.E. Region (TMNE) |
| 10 | Ministry of Electronics & Information Technology | PMG-DISHA and Common Service Centres |
| 11 | Ministry of Communication | Telecom Connectivity/ Bharat Net/Postal Banking |
| 12 | Ministry of Women & Child Development | Integrated Child Development Services (ICDS) |
| 13 | Ministry of Labour & Employment | Grant in Aid on Child and Women Labour Skill Development Initiative Craftsmen Training Scheme Apprenticeship Training Schemes |
| 14 | Ministry of Water Resources, River Development & Ganga Rejuvenation | Accelerated Irrigation Benefit Programme (AIBP) Repair, Renovation & Restoration (RRR) of Water Bodies |
| 15 | Department of Land Resources | Integrated Watershed Development Programme |
| 16 | Ministry of Micro, Small and Medium Enterprises | Prime Minister's Employment Generation Programme |
| 17 | Ministry of Panchayati Raj | Backward Regions Grant Fund |
| 18 | Ministry of New and Renewable Energy | National Biogas and Manure Management Programme Solar Energy Programme |
| 19 | Banks | Priority Sector Lending Differential Rate of Interest Scheme |

२. <u>गॅप फिलिंग :</u>

संबंधित गावात केंद्र व राज्य शासनाच्या विद्यमान / कार्यान्वीत योजनांतर्गत मुलभूत सोयीसुविधांची जी कामे केली जातात, त्या योजनांमधून उपलब्ध निधी कमी पडल्यास त्यामध्ये प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजनेंतर्गत प्राप्त निधी समाविष्ट करुन सदर कामे पूर्ण करणे अपेक्षित आहे. उदा.: गावात राज्य शासनाच्या योजनेतून अंगणवाडी बांधकाम करावयाचे असेल व त्याची एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १५.०० लक्ष इतकी आहे, अशा स्थितीत राज्य शासनाकडून रुपये १०.०० लक्ष प्राप्त झाल्यास उर्वरित रुपये ५.०० लक्ष प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजनेतून खर्च करणे अपेक्षित आहे. सदर बाबी अंतर्गत कोणकोणती कामे करता येतील? याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :

१. पिण्याचे पाणी व मल:निस्सारण सुविधा निर्माण करणे
२. ओला व सुक्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सुविधा निर्माण करणे
३. शाळा व अंगणवाडीमध्ये शौचालयाचे बांधकाम व दुरुस्ती करणे
४. अंगणवाडी बांधकाम करणे
५. सौरऊर्जा पथदिव्यांची सोय करणे
६. Construction of all weather roads

**२. गाव विकास आराखडा तयार करणे (Village development Plan) :**

उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमूद केल्यानुसार संबंधित गावांमध्ये प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजनेंतर्गत आवश्यक मुलभूत सोयीसुविधा निर्माण करणे व गावांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी संबंधित ग्राम पंचायतीने ५



Scanned with CamScanner

वर्षाचा गाव विकास आराखडा करणे अपेक्षित आहे. त्यासाठी संबंधित ग्राम पंचायतीने गावाच्या गरजा विचारात घेऊन असा आराखडा तयार करावा. यापूर्वी असा आराखडा तयार केलेला असेल तर त्यामध्ये कांही आवश्यक फेरबदल करुन हा आराखडा अंतिम करता येईल. मात्र पूर्वी असा आरखडा तयार केलेला नसेल तर सदर योजनेंतर्गत प्राप्त निधी खर्च करण्यासाठी पुढील ५ वर्षाचा सर्वसमावेशक असा गाव विकास आराखडा तयार करावा. सदर आराखडा तयार करण्याची जबाबदारी संबंधित ग्राम पंचायतीची आहे. सोबतच गावातील प्रत्येक घराचे सर्वेक्षण करुन माहिती गोळा करणे अपेक्षित आहे, जेणेकरुन गावात नेमकी काय योजना राबविणे आवश्यक आहे? हे ठरविणे शक्य होईल. सदर गाव विकास आराखडा संबंधित गावातील सरपंच यांच्या अध्यक्षतेखालील स्थानिक समितीने तयार करुन त्यास ग्राम सभेची मान्यता घ्यावी व अशी मान्यता झाल्यानंतर हा आराखडा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीकडे मंजूरीसाठी पाठवावा. असा गाव विकास आराखडा प्राप्त झाल्यानंतर जिल्हास्तरीय समितीने तपासून तो मंजूर करावा. या मंजूरीनंतरच सदर आराखडयानुसार संबंधित गावात मुलभूत सोयीसुविधा निर्माण करण्याची कामे हाती घेता येतील.

**गाव विकास आराखडा तयार करतांना खालील प्रपत्रामध्ये माहिती जमा करावी :**

१. गाव पातळीवरील माहिती - प्रपत्र १

२. गावात उपलब्ध असलेल्या मुलभूत सोयी सुविधा व भविष्यात निर्माण करावयाच्या सोयी सुविधा याबाबतची माहिती - प्रपत्र २

३. वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी घरनिहाय सर्वेक्षण - प्रपत्र ३

**गाव विकास आराखडयात गावात उपलब्ध असलेल्या मुलभूत सोयी सुविधा व भविष्यात निर्माण करावयाच्या सोयी सुविधा याबाबत अचुक माहिती असणे आवश्यक आहे.**

**गाव विकास आराखडा खालील प्रपत्रात तयार करणे आवश्यक आहे :**

**१.** मुलभूत सोयी-सुविधांबाबत कामांचा प्रगती अहवाल व कृती आराखडा - प्रपत्र ४

**२.** वैयक्तिक लाभाच्या योजनांचा प्रगती अहवाल व कृती आराखडा - प्रपत्र ५

**३.** गावात उपलब्ध सोयी सुविधांनुसार भरावयाचा गुणांकन तक्ता - प्रपत्र ६

**३. निधीची उपलब्धता:**

प्रधान मंत्री आदर्श ग्राम विकास योजनेंतर्गत निवड केलेल्या प्रत्येक गावास केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयामार्फत रुपये २१.०० लक्ष इतके अनुदान देण्यात येईल. यामधील रुपये २०.००लक्ष हे गाव विकास आराखडयातील गॅप फिलिंगची कामे करण्यासाठी खर्च करता येतील तर उर्वरित रुपये १.००लक्ष हे प्रशासकीय व इतर खर्चासाठी वापरता येतील. प्रशासकीय व इतर खर्चामध्ये तांत्रिक सहाय्य, प्रशिक्षण, क्षमतावृत्ती, जनजागृती व प्रसिध्दी इत्यादी बाबींचा समावेश असेल. सदर रुपये १.०० लक्ष रकमेतून केंद्र, राज्य, जिल्हा व गाव पातळीवर प्रशासकीय व इतर खर्च करणे अपेक्षित असून यामध्ये केंद्र, राज्य, जिल्हा व गाव पातळीवर १:१: १:२ या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

सदर योजनेतून करावयाच्या कामासाठी संबंधित गावाने राज्य व केंद्र शासनाच्या वेगवेगळया योजनांमधून कमीत कमी ३ ते ४ पट निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे, जेणेकरुन गावात मुलभूत सोयी सुविधांची पुरेशी कामे केली जातील.



Scanned with CamScanner

**४. निधी वितरणाची कार्यपध्दती :**

**पहिला हप्ता :**

सदर योजनेंतर्गत केंद्र शासनामार्फत संबंधित राज्यांना दोन हप्त्यात निधी वितरण करण्यात येईल. त्यामध्ये पहिल्या हप्त्यात ५०% पर्यत निधी योजनेची प्रचार प्रसिध्दी करणे, क्षमता वृध्दीकरणे, गाव विकास आराखडा तयार करणे इत्यादी कामांसाठी वितरित करण्यात येईल. त्यानुसार संबंधित राज्यामार्फत सदरचा निधी जिल्हास्तरीय यंत्रणेस उपलब्ध करुन दिला जाईल.

गॅप फिलिंग अंतर्गत करावयाच्या कामाचा निधी गाव विकास आराखडा जिल्हा स्तरीय समितीने मंजूर केल्यानंतर संबंधित ग्राम पंचायतीस वितरित करण्यात येईल. संबंधित ग्राम पंचायतीने सदर निधी मंजूर कामे करण्यासाठी निश्चित केलेल्या कार्यान्वयीन यंत्रणेस उपलब्ध करुन द्यायचा आहे.

**दुसरा हप्ता :**

केंद्रीय स्तरावरील सनियत्रंण समितीमार्फत आढावा घेतल्यानंतर व पुरेशा प्रमाणात प्रगती झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर दुसऱ्या हप्त्याचा निधी केंद्र शासनाकडून राज्य शासनास वर्ग करण्यात येईल.

**५. तांत्रिक सहाय्य :**

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय स्तरावर नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ रुरल डेव्हलपमेंट ॲण्ड पंचायत राज (NIRD & PR), हैद्राबाद या ग्रामविकासासाठी काम करणाऱ्या प्रशिक्षण संस्थेमार्फत तांत्रिक सहाय्य व मदत (प्रशिक्षण व इतर बाबी) करण्यात येईल. याच धर्तीवर राज्य व जिल्हा स्तरावर राज्य शासनामार्फत प्रशिक्षण संस्थेची निवड करुन या संस्थेमार्फत तांत्रिक सहाय्य पुरविण्यात येईल. अशी संस्था निवडण्याची जबाबदारी राज्य शासनाची असेल.

**सदर प्रशिक्षण संस्थेमार्फत खालील बाबींवर प्रशिक्षण देण्यात येईल :**

- ✓ राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना मुलभूत प्रशिक्षण
- ✓ विविध पातळीवरील प्रशिक्षणासाठी कार्यक्रम तयार करणे
- ✓ सदर योजनेचे नियोजन, अंमलबजावणी व सनियंत्रण यासाठी संबंधित यंत्रणांना प्रशिक्षण देणे

**६. योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य, जिल्हा व गाव पातळीवर समित्यांची स्थापना :**

सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासन, जिल्हा पातळी व गाव पातळीवर खालील प्रमाणे समित्यांची स्थापना/गठन करण्यात येत आहे :

**अ) राज्यस्तरीय सल्लागार समिती :**

| क्र. | पदाधिकारी/अधिकारी यांचे पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मंत्री,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २ | मंत्री, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सह अध्यक्ष |
| ३ | सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४ | सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५ | सचिव, महिला व बालकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |



Scanned with CamScanner

| क्र. | पदाधिकारी/अधिकारी यांचे पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ६ | सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ७ | सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ८ | सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई | सदस्य |
| ९ | सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १० | सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ११ | सचिव, पाटबंधारे व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १२ | सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १३ | सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १४ | राज्यस्तरीय प्रमुख , राष्ट्रीय सूचना केंद्र, मुंबई | सदस्य |
| १५ | प्रतिनिधी, राज्य अनुसूचित जाती, जमाती आयोग, मुंबई | सदस्य |
| १६ | राज्यस्तरीय प्रतिनिधी, दूरसंचार विभाग, मुंबई | सदस्य |
| १७ | मागासवर्ग कल्याणाशी संबंधित क्षेत्रात काम करणारे किमान ६ सामाजिक कार्यकर्ते व तज्ञ व्यक्ती | सदस्य |
| १८ | प्रतिनिधी, अग्रणी बँक | सदस्य |
| १९ | प्रतिनिधी, ग्रामविकास विभाग, केंद्र शासन | सदस्य |
| २० | प्रतिनिधी, सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय, केंद्र शासन | सदस्य |
| २१ | प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :**

(१) योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे व मार्गदर्शन करणे.

(२) सदर समितीची बैठक ६ महिन्यातून किमान एकदा याप्रमाणे वर्षातून किमान २ वेळा घेण्यात यावी.

**ब) राज्यस्तरीय सनियंत्रण समिती :**

| क्र. | पदाधिकारी/अधिकारी यांचे पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| २ | सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ३ | सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४ | सचिव, महिला व बालकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५ | सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ६ | सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ७ | सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई | सदस्य |
| ८ | सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ९ | सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १० | सचिव, पाटबंधारे व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ११ | सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |



Scanned with CamScanner

| क्र. | पदाधिकारी/अधिकारी यांचे पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १२ | सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १३ | प्रतिनिधी, राज्य अनुसूचित जाती, जमाती आयोग, मुंबई | सदस्य |
| १४ | सदर योजनेंतर्गत ज्या गांवांची निवड झाली आहे, अशा ५ जिल्हयातील कार्यक्रम संचालक (PMAGY) | सदस्य |
| १५ | राज्यस्तरीय प्रमुख, राष्ट्रीय सूचना केंद्र, मुंबई | सदस्य |
| १६ | राज्यस्तरीय प्रतिनिधी, दूरसंचार विभाग, मुंबई | सदस्य |
| १७ | मागासवर्ग कल्याणाशी संबंधित क्षेत्रात काम करणारे किमान २ सामाजिक कार्यकर्ते व तज्ञ व्यक्ती | सदस्य |
| १८ | प्रतिनिधी, अग्रणी बॅक ( ) | सदस्य |
| १९ | प्रतिनिधी, ग्रामविकास विभाग, केंद्र शासन | सदस्य |
| २० | प्रतिनिधी, सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय, केंद्र शासन | सदस्य |
| २१ | प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :**

(१) योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे व मार्गदर्शन करणे.

(२) सदर समितीची बैठक ६ महिन्यातून किमान एकदा याप्रमाणे वर्षातून किमान २ वेळा घेण्यात यावी.

**क) राज्य स्तरीय प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजना कन्व्हर्जन्स समिती :**

| क्र. | पदाधिकारी/अधिकारी यांचे पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | प्रधान सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २ | सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ३ | सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४ | सचिव, महिला व बालकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५ | सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ६ | सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ७ | सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई | सदस्य |
| ८ | सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ९ | सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १० | सचिव, पाटबंधारे व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ११ | सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १२ | सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १३ | सदर योजनेंतर्गत ज्या गांवांची निवड झाली आहे अशा २ जिल्हयातील कार्यक्र संचालक (PMAGY) | सदस्य |
| १४ | राज्यस्तरीय प्रमुख, राष्ट्रीय सूचना केंद्र, मुंबई | सदस्य |



Scanned with CamScanner

| क्र. | पदाधिकारी/अधिकारी यांचे पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १५ | राज्यस्तरीय प्रतिनिधी, दुरसंचार विभाग, मुंबई | सदस्य |
| १६ | प्रतिनिधी, अग्रणी बॅंक | सदस्य |
| १७ | आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :**

(१) योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे व मार्गदर्शन करणे.

(२) सदर समितीची बैठक ३ महिन्यातून किमान एकदा याप्रमाणे वर्षातून किमान ४ वेळा घेण्यात यावी.

**ड) जिल्हास्तरीय प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजना कन्व्हर्जन्स समिती :**

| क्र. | पदाधिकारी/अधिकारी यांचे पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | जिल्हाधिकारी, संबंधित जिल्हा | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सह अध्यक्ष |
| ३ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद | सदस्य |
| ४ | जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी | सदस्य |
| ५ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद | सदस्य |
| ६ | जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय | सदस्य |
| ७ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद | सदस्य |
| ८ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ९ | कार्यकारी अभियंता, पाटबंधारे व जलसंधारण (राज्य स्तरीय) | सदस्य |
| १० | जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय | सदस्य |
| ११ | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित | सदस्य |
| १२ | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कृषी विभाग | सदस्य |
| १३ | जिल्हास्तरीय प्रमुख, राष्ट्रीय सूचना केंद्र | सदस्य |
| १४ | सदर योजनेंतर्गत ज्या गांवांची निवड झाली आहे अशा २ गांवातील कार्यक्रम संचालक (PMAGY) | सदस्य |
| १५ | जिल्हास्तरीय प्रतिनिधी, भारत दुरसंचार निगम लिमिटेड | सदस्य |
| १६ | प्रतिनिधी, जिल्हा अग्रणी बॅंक | सदस्य |
| १७ | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| १८ | सहायक आयुक्त,समाज कल्याण | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :**

(१) योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे व मार्गदर्शन करणे.

(२) गांव पातळीवर योजना राबवितांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करणे.

(३) योजना राबविण्यासाठी आवश्यकता पडल्यास इतर विभागांचे सहाय्य उपलब्ध करुन देणे.



Scanned with CamScanner

(४) योजनेबाबत प्राप्त तक्रारींचे निराकरण करणे.

(५) राज्याकडून प्राप्त निधी संबंधित गावास विहित मुदतीत वर्ग करणे व झालेल्या खर्चाचा व कामाच्या प्रगतीचा आढावा घेणे.

(६) योजनेचा प्रगती अहवाल आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दर २ महिन्यांनी सादर करणे.

(७) सदर समितीची बैठक दरमहा घेण्यात यावी.

**इ) गावपातळी वरील प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजना कन्व्हर्जन्स समिती :**

| क्र. | पदाधिकारी/अधिकारी यांचे पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | सरपंच, ग्राम पंचायत | अध्यक्ष |
| २ | ग्राम पंचायतीतील अनुसूचित जातीचे सर्व सदस्य | सदस्य |
| ३ | आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका | सदस्य |
| ४ | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा. | सदस्य |
| ५ | ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी. | सदस्य |
| ६ | तलाठी | सदस्य |
| ७ | कृषी सहाय्यक, कृषी विभाग | सदस्य |
| ८ | ग्राम पंचायतीतील अनुसूचित जातीचा सदस्य (सदस्य सचिवाची निवड ग्राम पंचायतीने एकमताने करावी) | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :**

(१) योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

(२) सदर योजनेसाठी प्राप्त निधी विहित मुदतीत खर्च करणे व त्याबाबतची उपयोगीता प्रमाणपत्रे जिल्हास्तरीय समितीमार्फत आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सादर करणे.

(३) योजनेबाबत प्राप्त तक्रारींचे निराकरण करणे.

(४) सदर समितीची बैठक दरमहा घेण्यात यावी.

**७. विविध पातळयावरील कार्यक्रम संचालकाची नियुक्ती व जबाबदारी :**

केंद्र व राज्य स्तरावरील संनियंत्रण समित्यांचे सदस्य सचिव अनुक्रमे केंद्र व राज्य स्तरावर कार्यक्रम संचालक म्हणून काम पाहतील.त्याचप्रमाणे जिल्हापातळीवर जिल्हाधिकारी या योजनेसाठी कार्यक्रम संचालक म्हणून काम पाहतील. जिल्हास्तरावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हाधिकारी यांना सहाय्य करतील. गाव पातळीवर सरपंच हे कार्यक्रम संचालक म्हणून काम पाहतील. सर्व स्तरावरील कार्यक्रम संचालक हे योजनेची विहीत मुदतीत प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार असतील.

**८. निधी खर्च करण्याची मुदत :**

सदर योजनेतंर्गत नव्याने निवड केलेल्या गावांना मंजूर केलेला निधी खर्च करण्याची मुदत केंद्र शासनाने निधी वितरीत केल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाची राहील. तसेच ज्या गावांना निधी यापुर्वी मंजूर केला



Scanned with CamScanner

आहे, अशा गावांना अतिरिक्त निधी मंजूर झाल्यास असा निधी खर्च करण्याची मुदत केंद्र शासनाने निधी वितरित केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाची राहील.

**९. सनियंत्रण यंत्रणा : योजनेचा प्रगती अहवाल सादर करणे, योजनेचे सनियंत्रण करणे, योजनेचे मुल्यांकन करणे तसेच योजनेचे सामाजिक अंकेक्षण करणे इत्यादी :**

**अ) मासिक प्रगती अहवाल सादर करणे :**

जिल्हा स्तरावरील कार्यक्रम संचालक तथा जिल्हाधिकारी हे सदर योजनेचा गावनिहाय प्रगती अहवाल दरमहा विहीत प्रपत्रात ( प्रपत्र ४,५ व ६ ) सादर करतील तसेच जिल्हा स्तरावरील कार्यक्रम संचालक तथा जिल्हाधिकारी मासिक प्रगती अहवाल दरमहा विहीत प्रपत्र क्रमांक ७ मध्ये तर राज्य स्तरीय कार्यक्रम संचालक मासिक प्रगती अहवाल दरमहा विहीत प्रपत्र क्रमांक ८ मध्ये सादर करतील.

**आ)** सदर योजनेतंर्गत मंजूर कामांचा विविध स्तरावर संबधित सनियंत्रण समित्यांमार्फत आढावा घेण्यात येईल.

**इ)** मासिक प्रगती अहवाल प्रणाली विकसित करणे व तीची अंमलबजावणी करण्यासाठी येणारा खर्च सदर योजनेसाठी प्राप्त तरतुदीतून भागविण्यात येईल. यामधून खालील बाबींवर खर्च करण्यात येईल:

- ✓ योजनेचा मासिक प्रगती अहवाल तयार करण्यासाठी संगणक प्रणाली तयार करणे.
- ✓ मासिक प्रगती अहवाल हाताळण्यासाठी योग्य प्रशिक्षित कर्मचा-यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणे.
- ✓ सदर कामासाठी इंटरनेट कनेक्शनसह संगणकाची सोय करणे.

**ई)** ग्रामविकास, समाज शास्त्र व व्यवस्थापन क्षेत्रातील नामांकित अशा संस्थेमार्फत सदर योजनेचे स्वतंत्रपणे मुल्यमापन करण्यात येईल.

**उ)** राष्ट्रीय रोजगार हमी कायदा, २००५ मधील कलम १७ नुसार सदर योजनेचे सामाजिक अंकेक्षण संबधित ग्रामसभेने करणे अपेक्षित आहे.

**१०. उत्कृष्ट काम करणा-या ग्राम पंचायतींना राष्ट्रीय व राज्यस्तरावरील पुरस्कार देणे :**

सदर योजनेतंर्गत चांगले काम करण्यासाठी राज्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी प्रत्येक राज्यातून उत्कृष्ट काम करणाऱ्या तीन गावांना ( निवडलेल्या ५० गावांमधून १ गाव ) निवड समितीने निश्चित केलेल्या निकषांनुसार प्रत्येकी रूपये ५.०० लाख याप्रमाणे राज्य स्तरीय पुरस्कार देण्यात येईल तसेच अशा राज्य स्तरीय पुरस्कार मिळालेल्या गावांमधून तीन गावांना प्रत्येकी रुपये १०.०० लाख याप्रमाणे राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार देण्यात येईल.

**११. सर्वसाधारण सूचना:**

१) सदर योजनेंतर्गत प्राप्त निधी कोषागारातून आहरीत करण्यासाठी सहायक आयुक्त,समाज कल्याण, संबंधीत जिल्हा यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. करीता त्यांनी योजनेसाठी प्राप्त निधी कोषागारातून आहरीत करुन जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने संबंधित ग्राम पंचायतीस वर्ग करावा.

२) सदर योजनेंतर्गत करावयाची कामे वित्त विभागाच्या सूचनेनुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन ई-निविदा प्रक्रिया राबवून करावीत.



Scanned with CamScanner

३) सदर योजनेसाठी प्राप्त निधी संबंधित ग्राम पंचायतीने सरपंच व ग्रामसेवक यांच्या संयुक्त नावाने स्वतंत्र बॅक खाते उघडून त्यात जमा करावा व रकमेचे प्रदान धनादेशाद्वारे अथवा RTGS द्वारे करावे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०८२६१२३७४९७७२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sunil D Sardar

Digitally signed by Sunil D Sardar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0098eb68042c66b72115bc62ef9206ece429 81aab126657128d7cadca447533, cn=Sunil D Sardar
Date: 2019.08.26 12:48:35 +05'30'

**( सुनिल सरदार )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग, सर्व,
३. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सर्व,
४. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र,मुंबई,
६. महालेखापाल (लेखापरिक्षा)-१,महाराष्ट्र, मुंबई,
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र,नागपूर,
८. महालेखापाल (लेखापरिक्षा)-२,महाराष्ट्र, नागपूर,
९. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य,मुंबई,
१०. सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई,
११. सर्व कार्यासने, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई,
१२. निवड नस्ती/अजाक.

Scanned with CamScanner

**<u>परिशिष्ट</u>**

| क्र. | तपशिल | वस्तुस्थिती | गुणांकन |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | पिण्याच्या पाण्याची सुविधा व मलनिस्सारण | | |
| २ | शिक्षण | | |
| ३ | आरोग्य व पोषक आहार सुविधा | | |
| ४ | सामाजिक संरक्षण | | |
| ५ | ग्रामीण रस्ते व गृहनिर्माण | | |
| ६ | विज पुरवठा व गॅस जोडणी | | |
| ७ | कृषी विषयक उपाययोजना | | |
| ८ | वित्तीय पुरवठयाच्या सोयी सुविधा | | |
| ९ | संगणकीकरण सुविधा (डिजिटायजेशन) | | |
| १० | रोजगार निर्मिती व कौशल्य विकास | | |



Scanned with CamScanner